RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(१०)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ५३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम **११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XLI OF 2025.**

A BILL

TO PROVIDE FOR SCHEME FOR ERADICATION OF UNEMPLOYMENT FROM THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१.**

**महाराष्ट्र राज्यातील बेकारीचे निर्मूलन करण्यासाठी योजनेची तरतूद करण्याकरिता विधेयक.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, राज्यातील बेकारी निर्मूलन करण्यासाठी योजनेची तरतूद करणे इष्ट आहे, **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र बेकारी निर्मूलन अधिनियम, २०२५ असे म्हणावे:-- संक्षिप्त नाव व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो तात्काळ अंमलात येईल.

व्याख्या. **२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर.—

" विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये तयार केलेल्या नियमाद्वारे विहित केलेले असा आहे.

नागरिकांना नोकरी. **३.** राज्य शासन, ज्या नागरिकाने वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली आहेत आणि ज्यांनी सेवायोजन केंद्रात नोंद केलेली आहे अशा प्रत्येक नागरिकास त्याचे वय, पात्रता आणि आरोग्य यास अनुसरून योग्य अशी नोकरी देण्याकरिता प्रयत्नांची शिकस्त करील.

बेकारी भत्ता देणे. **४.** कलम ३ अन्वये नागरिकाला नोकरीची तरतूद करण्यात येईतोपर्यंत, त्याला किंवा तिला विहित करण्यात येईल असा बेकारी भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

बेकारी विमा योजना. **५.** या अधिनियमान्वये, राज्य शासन, बेकारी भत्ता प्रदान करण्याकरिता विशेष निधीची तरतूद करण्यासाठी बेकारी विमा योजना सुरू करील.

बेकारी विमा योजनेकरिता अंशदान. **६.** या अधिनियमान्वये, ज्या नागरिकाने, त्याचे नाव सेवायोजन केंद्रामध्ये नोंदविले आहे तो, नोकरी मिळाल्यानंतर लगेच विहित कालावधीकरिता बेकारी विमा योजनेत अंशदान देण्यासाठी त्याने एक करार सादर करण्याच्या अधीन राहून, विहित करण्यात येतील अशा दराने बेकारी भत्त्याचा लाभ मिळण्यास पात्र असेल.

नियम करण्याचा अधिकार. **७.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता **शासकीय राजपत्रातील,** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता अशा नियमान्वये प्रामुख्याने पुढील बाबींकरिता तरतूद करता येईल :—

(क) कलम ४ मध्ये निर्दिष्ट केलेले बेकारी भत्त्याचे दर आणि पात्रता आणि कुशलतेच्या आधारावर वेगवेगळे दर विहित करता येतील ः

(ख) बेकारी विमा योजनेचे आवश्यक तपशील ः

(ग) कलम ६ अन्वये बेकारी विमा योजनेस करावयाच्या अंशदानाचा दर ः

(घ) या अधिनियमान्वये सर्व प्रकारचे प्रदान नियमाधीन करण्याची कार्यपद्धती आणि

(च) विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन किंवा अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले किंवा तो नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहांचे एकमत झाले व त्यांनी असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित केला तर, तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

राज्यात बेकारीच्या समस्येने उग्र स्वरूप धारण केलेले आहे सुशिक्षित नागरिकसुद्धा दरिद्री झाले आहेत. देशात नोकरीची संधी मिळत नसल्याने व बुद्धिजीवी वर्ग परदेशात जाऊ लागल्याने देशाची हानी होत असून कुशल व अकुशल व्यक्तींचा लोंढा मोठ्या संख्येने परदेशात जात आहे. राज्यातील नागरिकांना नोकरीची हमी देण्याची आणि ज्यांना नोकरी मिळवणे शक्य झालेले नाही अशा नागरिकांना बेकारी भत्ता देण्याची तरतूद करण्याकरिता राज्याने ठोस प्रयत्न करण्याची आवश्यकता असून या प्रयोजनार्थ बेकारी विमा योजनेस प्रोत्साहन देणे देखील आवश्यक झाले आहे जेणेकरुन या योजनेद्वारे बेरोजगारांच्या मदतीसाठी आर्थिक निधीची पूर्तता करता येऊ शकेल.

वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २७ मे २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

## वित्तीय ज्ञापन

खंड ४ व ५ अन्वये राज्यातील नागरिकाला नोकरीची तरतूद करण्यात येईतोपर्यंत, त्याला किंवा तिला विहित करण्यात येईल असा बेकारी भत्ता मिळण्याच्या हक्काची तरतूद करण्यात आली आहे, त्या प्रयोजनार्थ विशेष निधीची तरतूद करण्यासाठी बेकारी विमा योजना सुरू करण्याचीही तरतूद करण्यात आली आहे. त्यासाठी राज्याच्या एकत्रित निधी मधून कराव्या लागणाऱ्या प्रत्यक्ष आवर्ती खर्चाचा अंदाज या टप्प्यावर देता येणे शक्य नाही.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ जुलै २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१),
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.